# अर्थबोध पत्रिका

अंक - २ जानेवारी १९९९

महत्वाच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक
विषयावरील माहिती सर्वापर्यंत पोचवणारे माध्यम

---

**भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी**

'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६.

(केवळ खाजगी वितरणासाठी)

## अर्थबोध पत्रिके विषयी ...

भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी या संस्थेतर्फे "अर्थबोध पत्रिका" हे आर्थिक, सामाजिक, व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे नियतकालिक प्रकाशित करण्यात येत आहे. सर्वसामान्य मराठी वाचकांना आर्थिक, सामाजिक, व राजकीय विषयांवरील अभ्यासपूर्ण माहिती देणे, एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे समजावून देणे, व विविध समस्यांच्या संदर्भातील सैद्धांतिक व संकल्पनात्मक बाबी समजावून देणे हे यामागील उद्देश आहेत. अशा विषयांवरील सखोल माहिती व सैद्धांतिक बैठक असणारे विश्लेषणात्मक लेख छापणारी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके व पुस्तके मराठी वाचकांपर्यंत पोहचत नाहीत. अशा नियतकालिकातील माहिती व विश्लेषण यांच्या आधारे लिहिलेल्या लेखांचा अर्थबोध पत्रिकेत समावेश असेल.

अर्थबोध पत्रिका अंक-२, जानेवारी १९९९
[याआधीचा अंक - १ (नमुना अंक), प्रकाशन नोव्हेंबर १९९८]

भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी, पुणे यांनी अक्षरजुळणी करुन
व छापून खाजगी वितरणासाठी प्रसिध्द केले.
**मुद्रक** - एस. के. प्रिंटर्स,
परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे, ३०.

# अर्थबोध पत्रिका

**अंक - २** **जानेवारी १९९९**

महत्वाच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक
विषयावरील माहिती सर्वापर्यंत पोचवणारे माध्यम

**भारतीय अर्थ विज्ञान वर्धिनी**
'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६.
फोन : ३५७१३२ / ३५७२१०

(केवळ खाजगी वितरणासाठी)

# अर्थबोध पत्रिका

**अंक - २** **जानेवारी १९९९**

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | अणुयुद्ध की अर्थयुद्ध? | १ |
| २. | जहाजांची विल्हेवाट लावण्याचा घातक उद्योग | ६ |
| ३. | निर्णयप्रक्रियेतील लोकांचा सहभाग | ११ |
| ४. | बहुराष्ट्रीय कंपन्यांचे युग | १७ |
| ५. | जागतिक धरण आयोग : एक आशादायक प्रक्रिया | २२ |

**सूचना** - या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे.

# अणुयुध्द की अर्थयुध्द ?

नव्या शतकाचा प्रारंभ आता काही महिन्यांवर येऊन ठेपला आहे. संपूर्ण जग त्याच्या स्वागताच्या तयारीत आहे. गेल्या शतकाने काय दिले याचा विचार या घडीला जगात सर्वत्र केला जात आहे. याबरोबरच यानिमित्ताने भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्नही सुरू आहे. भविष्याचा वेध घेण्याचा असाच एक प्रयत्न ह्या लेखात करण्यात आला आहे. त्यासाठी "स्पॅन" (सप्टेंबर/ऑक्टोबर ९७) आणि "द इकॉनॉमिस्ट" (३ ते ९ जानेवारी, १९९८) या नियतकालिकांमधील लेखांचा आधार घेण्यात आला आहे.

**मागे वळून पाहताना........**

सरत्या शतकाकडे नजर टाकली असता सर्वप्रथम आठवण होते ती दोन महायुध्दांची. पहिल्या महायुध्दाचे (१९१४ ते १९१८) परिणाम विसरले जाण्याआधीच दुसऱ्या महायुध्दाची (१९३९ ते १९४५) ठिणगी पडली आणि अणुबॉंबच्या धुरातच दुसरे महायुध्द संपले. ह्या दुसऱ्या महायुध्दानंतर आशिया व आफ्रिका खंडातील (भारतासह) अनेक देश स्वतंत्र झाले.

यानंतरचा काळ म्हणजे सोव्हिएट युनियन व अमेरिका या दोन महासत्तांच्या उदयाचा व त्यांच्यातील शीतयुध्दाचा. ह्या काळात संपूर्ण जगाचे या दोन महासत्तांच्या प्रभावक्षेत्रात विभाजन झाले होते. स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये औद्योगिक पर्व व हरितक्रांती आकार घेत असतानाच जगात अण्वस्त्रांची स्पर्धाही वाढत होती. अमेरिका आणि सोव्हिएट युनियन यांच्याबरोबरीने तिसरी महासत्ता बनण्याच्या दृष्टीने चीनचीही वाटचाल सुरू होती. सोव्हिएट युनियनचे विघटन, पूर्व युरोपीय राष्ट्रांनी साम्यवादाला दिलेली तिलांजली, शीतयुध्दाची समाप्ती, व त्याचबरोबरीने चीनचे अमेरिकेबरोबरचे वाढते व्यापारी व आर्थिक सहकार्य ह्या सर्व सरत्या शतकाच्या शेवटच्या टप्प्यातील महत्वाच्या घडामोडी. सोव्हिएट युनियन व त्याच्या मित्रराष्ट्रांकडून पूर्वी अमेरिकेला असलेले आव्हान आता न उरल्याने, शतकाच्या शेवटी

जगात अमेरिका व तिच्या मित्र राष्ट्रांची एकध्रुवीय अधिसत्ता निर्माण झाली आहे असे म्हटले जाते.

दोन महायुध्दानंतर, शतकाच्या उत्तरार्धात जागतिक शांततेसाठी सर्वत्र चर्चा व प्रयत्न सुरू असतानाही पाच महासत्तांच्या जोडीने इतर काही राष्ट्रेही आपापल्या परीने अण्वस्त्रसज्जतेकडे वाटचाल करीत होती, ही आणखी एक उल्लेखनीय बाब. हळूहळू भारत आणि पाकिस्तानसह अनेक राष्ट्रे उघड किंवा छुप्या रीतीने अण्वस्त्रसज्ज झाली. अण्वस्त्रप्रसाराला विरोध करणाऱ्या अण्वस्त्रधारी महासत्तांसाठी ही एक डोकेदुखी ठरली आहे. विसाव्या शतकाच्या अखेरीस विज्ञान व तंत्रज्ञानातील व विशेषतः इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे जगाचे रूपच बदलू लागले आहे. ह्या प्रगतीमुळे आर्थिक व राजकीय क्षेत्रामध्ये अनेक क्रांतीकारी बदल होऊ लागले आहेत. नव्या तंत्रज्ञानामुळे उद्योग व व्यापाराचे व विशेषतः भांडवलाच्या व्यापाराचे जागतिकीकरण होऊ लागले आहे. याचबरोबर राष्ट्राराष्ट्रांच्या याआधी कमीअधिक प्रमाणात बंदिस्त असणाऱ्या अर्थव्यवस्थांचे उदारीकरण, खाजगीकरण, व जागतिकीकरण होण्याच्या प्रक्रिया आता वेग धरीत आहेत. परिणामी, ह्या शतकाच्या अखेरीस जागतिक स्तरावर अर्थकारण व राजकारण यातील सीमारेषा पुसट होऊ लागल्या आहेत.

या सर्व पार्श्वभूमीवर एकविसाव्या शतकाचे स्वागत करताना या नव्या शतकात जगाचे भवितव्य काय असेल किंवा जगावर कोणत्या राष्ट्रांचे राजकीय वा आर्थिक वर्चस्व असेल असे प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. सध्या सुरू असलेली अण्वस्त्रस्पर्धा पहाता जगाची वाटचाल तिसऱ्या महायुध्दाकडे होत आहे का अशी शंकादेखील व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे नव्या शतकामध्ये तिसरे महायुध्द होईल का, झाले तर ते कसे असेल, या प्रश्नांचा उहापोह प्रथम करणे योग्य ठरेल.

## अणुयुध्दाची टांगती तलवार ?

महायुध्द ही कल्पनाच अंगावर शहारे आणणारी असली तरी आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी युध्द करणे व विजय मिळवून दाखविणे

ही जगाच्या इतिहासातील रीतच आहे. न्याय्य हक्कासाठी युध्द झाल्याच्याही अनेक नोंदी इतिहासात आहेत. पण अशा घटनांचे प्रमाण कमी असावे. इतरांवर वर्चस्व गाजवणे व अहंकार-पूर्तता यासाठी बहुतेक युद्धे लढली जात असली तरी काळाप्रमाणे युद्धाची साधने बदलत असतात. एकविसाव्या शतकात तिसरे महायुध्द झालेच तर त्यामध्ये अण्वस्त्रांचा वापर होईल का? हा प्रश्न आज परत जोराने चर्चिला जातो आहे. त्याबरोबर अशा महाविध्वंसक महायुध्दाची खुमखुमी कोणत्या राष्ट्रांना असू शकते? त्यांची भौगोलिक, आर्थिक, व राजकीय स्थिती कशी आहे? तिसरे व अण्वस्त्रांचे महायुध्द दोन राष्ट्रांमध्ये होईल की त्यात अनेक राष्ट्रे लढतील? ह्या मुद्यांवरही आज तज्ज्ञांच्यात चर्चा होत असते.

लष्करीदृष्ट्या सक्षम व आर्थिकदृष्ट्या भक्कम असलेली अमेरिका व चीन ही राष्ट्रे असे महायुध्द घडवून आणू शकतात असे मानले जाते. तिसऱ्या क्रमांकावर युरोपीय राष्ट्र-समुदाय आहे. पण ही राष्ट्रे आजतरी वेगवेगळी आहेत. युरोप व अमेरिका यांनी एकत्र यायचे ठरविले तर ते देश निश्चितच चीनपेक्षा शक्तिशाली ठरू शकतात. या व्यतिरिक्त इतर छोटी मोठी राष्ट्रे महायुध्द स्वतःहून घडवून आणू शकणार नाहीत. तेवढी त्यांची आर्थिक व लष्करी शक्ती नाही. प्रत्येक देशाचा वेगळा विचार केला तर आज (अमेरिका वगळता) चीनची लष्करी, आर्थिक, व राजकीय ताकद जास्त आहे असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. जागतिक घडामोडींकडे बारीक लक्ष ठेवून चीनने अतिशय सावधगिरीने आणि हुशारीने आपली अर्थव्यवस्था, लष्करी सामर्थ्य, व अण्वस्त्रसज्जता यांच्यात एक साखळी निर्माण केली आहे. चीनमध्ये ९३ टक्के नागरिक एकाच वर्णाचे (ethnic group) आहेत. साम्यवादाच्या चौकटीत चीनने नागरिकांचा विकास आणि राष्ट्राचे सामर्थ्य यांची सांगड उत्तमरीत्या घातली आहे. अर्थात तेथे सर्व काही "आलबेल" आहे असे नाही. तथापि चीन एक ताकदवान राष्ट्र आहे हे महत्वाचे. त्यामुळे चीनवर आवश्यक ते दडपण आणण्यासाठी अमेरिका व युरोपीय राष्ट्रे एकत्र येतील ही शक्यता जास्त आहे असे तज्ज्ञांना वाटते.

युरोप व अमेरिकेचा एकत्रित विचार करता असे आढळते की

विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व युरोप यांचे लष्करीसंबंध अगदी जवळचे झाले आहेत. अमेरिका व युरोप यांच्यातील व्यापार उभयपक्षी फायदेशीर ठरलेला आहे. युरोपीय राष्ट्रांतील व अमेरिकेतील नागरिकांचे समाजजीवन व धर्म यांच्यात बरेचसे साम्य आहे. याशिवाय युरोपने अकरा युरोपीय राष्ट्रांसाठी एक, असे "युरो" चलन वापरात आणून, युरोपचे ऐक्य साधण्याच्या दिशेने भरीव प्रगती केली आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत अमेरिकेच्या डॉलर खालोखाल युरोपचा दुसरा क्रमांक लागेल अशी लक्षणे दिसत आहेत. अमेरिकेने "युरो"ला कोणत्याही पातळीवर जरादेखील विरोध केलेला नाही. उलट त्याबाबतीत मौन पाळले आहे हे ह्या संदर्भात उल्लेखनीय आहे. या सर्व बाबींचा विचार करता अमेरिका व युरोप परस्परांत स्पर्धा न करता एकत्र येतील हा युक्तिवाद सबळ वाटतो.

## छुप्या अर्थयुध्दाची सुरुवात

चीन, युरोप, आणि अमेरिका यांची तिसरे अण्वस्त्रयुक्त युद्ध लढण्याची क्षमता असली तरी ही राष्ट्रे व त्यांचे सरकार अशा प्रकारचे युध्दप्रवण परराष्ट्र धोरण स्वीकारणार का? त्याहीपलिकडे जाऊन सरकारचे हे धोरण त्या देशांच्या नागरिकांना मान्य होईल का? ह्या प्रश्नांचा साकल्याने विचार करायला हवा. अणुयुध्द किंवा रासायनिक शस्त्रांद्वारे लढले जाणारे युध्द, हे मानव जातीसाठी अत्यंत क्लेशदायी व संहारक ठरेल व त्यातून बलवान देशांची जनता देखील सहीसलामत सुटणार नाही. तिसऱ्या महायुध्दाचे हे अतिसंहारक स्वरूप लक्षात घेता आपल्या देशाला व जगाला विनाशाच्या गर्तेत नेण्याचे धाडस कोणत्या राष्ट्राचे सरकार करील? लोकशाही व्यवस्था व मुक्त माध्यमे असलेल्या अमेरिका व युरोपीय राष्ट्रांच्या बाबतीत तर हे अशक्यच आहे. या सर्व बाबींचा विचार केला तर मुळात तिसरे महायुध्द होईल का? व झालेच तर त्यात अण्वस्त्रांचा वापर होईल का? ह्या प्रश्नांची होकारार्थी उत्तरे देणे कठीण वाटते.

वरील वस्तुस्थितीची जाणीव झाल्याने लष्करीदृष्ट्या बलवान राष्ट्रांनी जगावर वर्चस्व मिळविण्याची साधने बदलली आहेत असेही आता म्हटले

जाते. ह्यानंतरच्या काळात इतर देशांवर व जगावर वर्चस्व मिळवण्यासाठी लष्करी साधनांचा वापर न करता आर्थिक साधनांनी अप्रत्यक्ष अथवा छुपी युद्धे खेळली जातील अशी शक्यता वाटते. ह्या नव्या प्रकारच्या युद्धातले महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेवर ताबा मिळविणे व त्या माध्यमातून इतर राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांवर ताबा मिळवणे. राष्ट्रीय अर्थव्यवस्थांच्या उदारीकरणासाठीचा आग्रह व रेटा, जागतिक व्यापार संघटना, व व्यापारासंबंधीचे इतर जागतिक करार ह्या सर्व घडामोडींचा ह्या नव्या प्रकारच्या युद्धाशी कसा व कितपत संबंध आहे, हा प्रश्नही यासंदर्भात महत्वाचा आहे.

आज अमेरिका व चीन परस्परांशी व्यापारी सहकार्य करीत असतानाच जागतिक अर्थव्यवस्थेवर वर्चस्व मिळवण्यासाठी परस्परांशी स्पर्धा करण्याचा प्रयत्न करीत आहेत. युरोपीय राष्ट्रे अमेरिकेला पटणारी धोरणे राबवीत, स्वतःचा फायदा करून घेण्याच्या प्रयत्नात आहेत. तथापि चीनची अर्थव्यवस्था ज्या वेगाने पुढे जात आहे त्यावरून काही अर्थतज्ज्ञांनी इ. स. २०१० मध्ये चीनची अर्थव्यवस्था जगात प्रथम क्रमांकाची असेल असे मत व्यक्त केले आहे. औद्योगिकदृष्ट्या अतिशय प्रगत असणाऱ्या अमेरिका व युरोपीय राष्ट्रांना हा मोठा धक्का आहे. चीनमध्ये अमेरीका-युरोपच्या तुलनेत कमी मजुरीवर काम करणारा व संख्येने जास्त असा कामगार वर्ग आहे, ही चीनची एक महत्वाची जमेची बाजू आहे. त्यावर मात करण्यासाठी भारतासारख्या तांत्रिकदृष्ट्या पुढारलेल्या परंतु मजुरीचे दर स्वस्त असणाऱ्या देशांचा वापर अमेरिका व युरोपीय राष्ट्रे करून घेण्याची शक्यता काही तज्ज्ञ वर्तवितात. जागतिक अर्थयुद्धाची ही नवी साधने, नव्या दिशा, बदलते हितसंबंध हे सारे आपण सर्वांनीच सजगपणे लक्षात घेतले पाहिजेत. या जागतिक अर्थयुध्दात स्वतःचे हित कसे जपायचे हा प्रश्न भारतासाठी अतिशय महत्वाचा ठरणार आहे.

■■

# जहाजांची विल्हेवाट लावण्याचा घातक उद्योग

विकास व पर्यावरण ह्या दोन गोष्टी परस्परविरोधी आहेत असे मानून विकास विरुद्ध पर्यावरण हा वाद नेहमी खेळला जातो. अशा वादात विकासवादी व पर्यावरणवादी असे दोन गट असतात. पर्यावरणवादी पर्यावरणाचा विनाकारण बाऊ करतात व विकासाला खीळ घालतात असा आक्षेप विकासवादी घेतात; तर विकासाच्या नावाखाली आपण पर्यावरणाचा, पर्यायाने आपल्या स्वतःचा, विनाश करीत आहोत असे पर्यावरणवादी म्हणतात. ह्या वादावर अतिम, सर्वपरिस्थितीमध्ये लागू होणारा असा एकच तोडगा सापडणे कठीण आहे. मात्र ह्या तात्विक वादापलिकडे जाऊन पाहिल्यास प्रत्यक्षात अनेक बाबतीत पर्यावरणाकडे होणारे दुर्लक्ष ठसठशीतपणे दिसून येते. असाच एक दुर्लक्षित विषय आहे- विषारी औद्योगिक कचऱ्याचा. आजही आपल्या देशात हा विषय जनसामान्यांपर्यंत पोचलेला नाही. मात्र भारतासकट अनेक विकसनशील देशात आज ह्या कचऱ्यामुळे पर्यावरणाला, संबंधित उद्योगातील कामगारांना, व पर्यायाने जनतेच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला आहे. ह्या विषयाच्या विविध बाजूंवर प्रकाश टाकणारी ही कथा.

गुजरातमधील अलंग येथील समुद्र किनाऱ्यावर गेल्या काही वर्षात फोफावलेल्या एका नव्या उद्योगाची ही कथा आहे. जुनी, कालबाह्य, व निरुपयोगी झालेली जहाजे मोडून, त्यांचे सुटे भाग करून त्यांची भंगारात विल्हेवाट लावण्याचा उद्योग येथे जोरात चालतो. या टाकाऊ जहाजांचे मूळ सामान इतके खराब झालेले असते व त्यात विविध प्रकारच्या औद्योगिक, रासायनिक वस्तू इतक्या मोठ्या प्रमाणावर साचून व अडकून असतात की ही टाकाऊ जहाजे म्हणजे औद्योगिक व विषारी कचऱ्यांचे पेटारेच असतात. युरोपीय देशात अशी टाकाऊ जहाजे नष्ट करण्यासाठी आवश्यक अशी मोकळी, वर्दळीपासून व वस्तीपासून दूर असलेली जागा समुद्रकिनाऱ्यावर उपलब्ध होऊ शकत नाही. अमेरिकेतील पर्यावरणाचे कायदे इतके कडक आहेत की तेथे जागा असली तरी जहाजांच्या विल्हेवाटीचा उद्योग करणे त्या देशात शक्य नाही. याउलट भारतासारख्या विकसनशील देशात पर्यावरणाचे कायदे तितके कडक नाहीत व असलेल्या कायद्यांची अमलबजावणी ढिसाळ तऱ्हेने होते. शिवाय मजुरीचे दरही कमी

असतात. त्यामुळे युरोप व अमेरिकेतील टाकाऊ जहाजाचा व्यापार करणाऱ्यांना भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये विल्हेवाटीसाठी जहाजे पाठवणे सोयीचे ठरते. परिणामी युरोप व अमेरिकेतील अनेक देशातून मोठ्या संख्येने टाकाऊ जहाजे मोडण्यासाठी अलंगसारख्या ठिकाणी आणली जातात. मात्र गेल्या काही वर्षांपासून हा उद्योग वादाच्या भोवऱ्यात आहे. त्याची मुख्य कारणे तीन आहेत - १. प्रदूषणाचा प्रश्न २. कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ३. औद्योगिक व विषारी कचऱ्याच्या बेकायदेशीर आयातीचा प्रश्न.

### १. प्रदूषण

मोडण्यासाठी आणण्यात येणारी मोठमोठी जहाजे व त्यात राहून गेलेला औद्योगिक व विषारी कचरा यांची विल्हेवाट लावण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या चुकीच्या पद्धतींमुळे अलंग येथे प्रदूषणाचा प्रश्न फार मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याने अत्यंत विषारी ठरवलेले अनेक पदार्थ टाकाऊ जहाजांमध्ये साचून राहिलेले असतात. ह्यात घातक रंगद्रव्ये, ॲसबेसटॉससारखे पदार्थ, शिशासारख्या जड धातूंची संयुगे, पीसीबी ह्या आद्याक्षराने ओळखली जाणारी अत्यंत विषारी रासायनिक संयुगे ह्यांचा समावेश असतो. ह्या मानवनिर्मित विषारी पदार्थांचा निचरा अथवा विधटन निसर्गामध्ये होत नाही. परिणामी ते पदार्थ पर्यावरणातील जलचक्र, अन्नचक्र ह्या विविध साखळ्यातून वर्षानुवर्षे फिरत राहतात व सजीव सृष्टीमध्ये सर्वदूर पसरतात. वनस्पती, प्राणी, जलचर, व मानव ह्या सर्वांच्याच आरोग्याच्या दृष्टीने हे पदार्थ अत्यंत घातक असतात. ह्या दोन कारणांमुळे ह्या पदार्थांचे प्रदूषण (म्हणजे हवेत व पाण्यात मिसळणे) अत्यंत धोकादायक समजले जाते. अलंग येथील कारखान्यामध्ये कोणतीही काळजी न घेता हे पदार्थ हाताळले जातात व समुद्रात व जमिनीवर पसरतात. त्यामुळे केवळ स्थानिकच नव्हे तर प्रादेशिक व जागतिक पर्यावरणाची देखील हानी होते. थोडक्यात, अलंगच्या उद्योगांमुळे होणाऱ्या प्रदूषणाचा प्रश्न व्यापक व गंभीर आहे.

### २. कामगारांची सुरक्षा

जहाजांची विल्हेवाट लावण्याच्या ह्या उद्योगातील अलंग येथील पस्तीस हजार कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न देखील गंभीर स्वरुपाचा आहे.

जहाजाची विल्हेवाट लावताना अलंग येथील कारखान्यामध्ये घण व गॅस कटर सारखी अत्यंत प्राथमिक स्वरूपाची हत्यारे व साधने वापरली जातात. त्याचबरोबरीने काम करताना वापरल्या जाणाऱ्या पद्धतीही अत्यंत असुरक्षित असतात. योग्य प्रकारच्या व मजबूत अश्या परातींचा वापर न केल्याने अनेकदा कामगार उंचावरून पडतात. त्याचप्रमाणे जहाजाचे कापलेले अवजड तुकडे उचावरून पडून देखील अपघात होतात. घणांचा सतत वापर होत असल्याने कानठळ्या बसणाऱ्या आवाजाचे सर्वत्र साम्राज्य असते. गॅस कटरचा वापर होत असल्याने जहाजावरील मालसाठवणीच्या कप्प्यांमध्ये व नळ्यांमध्ये अडकून / साचून राहिलेल्या रासायनिक पदार्थांचे/वायूंचे स्फोट होतात किंवा त्यांचे ज्वलन होऊन विषारी वायू निर्माण होतात. या सर्व धोक्यांपासून डोके, कान, श्वसनेंद्रिये या नाजूक अवयवांचे रक्षण करण्यासाठी कामगारांना शिरस्त्राणे, मुखवटे (मास्क) यासारखी कोणतीही सुरक्षासाधने मालकांकडून पुरवली जात नाहीत. त्यामुळे बहुतेक कामगारांना श्वसनाचे व फुंफ्फुसाचे विकार असतात. व अपघातांचे प्रमाणही खूपच जास्त असते. अलंगच्या कारखान्यांमध्ये आठवड्याला किमान एक कामगार अपघाताने मृत्युमूखी पडतो असे दिसून येते. जखमी झालेल्या कामगारांनादेखील पुरेशी वैद्यकीय मदत वेळेवर मिळत नाही. थोडक्यात, अलंग येथील कामगार जिवावर उदार होऊनच काम करीत असतात. तरीही या कामगारांना कसेबसे उपजीविकेपुरते व तुटपुंजे वेतन मिळते. हे कामगार दुसऱ्या राज्यातून त्यांचे गाव सोडून आल्याने त्यांना निवाऱ्याचा प्रश्न असतोच. त्यामुळे कामानजीक, समुद्राजवळ झोपड्या बांधून ते राहतात. परिणामी, आरोग्याला घातक असणाऱ्या हवेशी त्यांचा सतत संबंध येतो व पाण्याजवळ राहूनही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न त्यांना भेडसावतो. स्वतःच्या गावात रोजगार नसल्याने त्यांना असेल त्या स्थितीत काम करण्याशिवाय गत्यंतर नसते.

### ३. विषारी कचऱ्याची बेकायदेशीर आयात

परदेशातून जी जहाजे येथे नष्ट करण्यासाठी पाठविली जातात त्यात बहुतेकवेळा परदेशातील विषारी असा औद्योगिक, रासायनिक कचरा भरण्यात आलेला असतो. ह्याचे कारण समजून घ्यायला हवे. युरोप व अमेरिकेत नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल चांगलीच जागरूकता आहे.

त्यामुळे तेथील पर्यावरणसंबंधातील कायदे फारच कडक आहेत, व त्यांची अमलबजावणीही कसोशीने व कठोरपणे केली जाते हे आपण पाहिलेच. उद्योगात व इतरत्र निर्माण होणाऱ्या विषारी कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंबंधातील तेथील कायदे तर अत्यंत कडक आहेत व ही विल्हेवाट लावताना पर्यावरणाची जी हानी होते त्याबद्दल भरपूर किंमत वसूल केली जाते. त्याचबरोबरीने असा आरोग्याला धोका निर्माण करणारा विषारी कचरा आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणे दुसऱ्या देशातही पाठविता येत नाही. ह्या बंदी घातलेल्या कचऱ्यामध्ये टाकाऊ जहाजांचाही समावेश आहे. त्यामुळे त्या देशातील टाकाऊ जहाजांच्या व्यापाऱ्यांनी कायद्यातील पळवाट शोधली आहे. जी जहाजे नष्ट करण्यासाठी पाठविण्यात येतात ती व्यापाराचे काही सामान घेऊन भारतात पाठविण्यात येतात. त्यावेळी त्यात व्यापारी सामानाबरोबर नष्ट करावयाचा विषारी कचराही भरण्यात येतो. असा कचरा असला तरी हे जहाज चालू स्थितीत असल्याने आंतरराष्ट्रीय कायद्यातील "कचरा" ह्या शब्दाच्या व्याख्येतून निसटून जाते. मात्र भारतात पोहचल्यावर त्या जहाजाची त्यातील कचऱ्यासकट विल्हेवाट लावण्यात येते. दरवर्षी अशी किमान तीनशे ते साडेतीनशे जहाजे भारताच्या किनारपट्टीवर नष्ट करण्यात येतात. अलंग येथे हा उद्योग फार मोठ्या प्रमाणावर असला तरी इतर ठिकाणीही असेच उद्योग लहान प्रमाणावर चालू असावेत.

### विरोधाला पुरून उरणारे व्यापारी

या सर्व प्रकाराविरुद्ध जगभरातील पर्यावरणवादी संघटनांनी आवाज उठविला आहे. युरोपात व अमेरिकेत काही ठिकाणी ह्या प्रकाराविरूद्ध निदर्शने झाली. पण त्याचा फारसा परिणाम तेथे झाला नाही. गंमत म्हणजे भारताने १९८९ मध्येच अशा कचऱ्याच्या आयातीबाबत कडक नियम केले आहेत. तरीही या उद्योगावर त्याचा कोणताही परिणाम झालेला नाही. हे पाहून भारतातील पर्यावरणवादी संघटनांनी सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेतली. या न्यायालयाने अशा विषारी कचऱ्याच्या आयातीवर बंदी घातली. ह्या बंदीचाही फारसा परिणाम झाला नाही. मुळात ह्या व्यापारावर अशी बंदी आहे हेच मुळी बऱ्याच ठिकाणच्या संबंधित अधिकाऱ्यांना माहीत नाही. या संदर्भात कस्टम अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की त्यांच्या अपुऱ्या संख्येमुळे

व कायद्यातील विविध पळवाटामुळे विषारी कचऱ्याचा आयातीला पूर्णपणे पायबंद घालणे त्यांना शक्य नाही. पर्यावरण मंत्रालयाने अशा व्यापारासाठी फक्त सात आयातदारांना ठराविक टन सामान आणण्याची परवानगी दिलेली आहे. एवढेच नव्हे तर भारतातील आयात-निर्यातीच्या नियमांप्रमाणे आयातदाराने विषारी कचऱ्याच्या आयातीसाठी प्रत्येकवेळी पूर्ण माहिती देऊन पूर्वपरवानगी (Prior Informed Consent) घेणे आवश्यक असते. पण आजपर्यंत एकदाही अशी परवानगी घेण्यात आलेली नाही. सात जणांना परवानगी दिली असली तरी प्रत्यक्षात मात्र किमान एकशेपन्नास आयातदार असा व्यापार करतात असे म्हटले जाते. आंतरराष्ट्रीय पातळीवर ही आयात-निर्यात रोखण्यासाठी एक करार (Basel Ban) करण्यात आला असून भारताने त्यावर सही करू नये असे प्रयत्न व्यापाऱ्यांचा हा गट करीत आहे. या व्यापारावर बंदी घालण्यामध्ये असलेली अजून एक अडचण म्हणजे सरकार यासंदर्भात दोन्ही बाजूने बोलताना आढळून येते. सरकार अलंगसारखे उद्योग बंद करण्याचा प्रयत्न करील असे पर्यावरणवादी संघटनांना, पर्यावरण मंत्रालयातर्फे सांगण्यात येते; तर सरकारचा या उद्योगांवर बंदी घालण्याचा विचार नाही असे उत्तर नियोजन मंडळातर्फे व्यापाऱ्यांना देण्यात येते.

एकंदरीत, इतर प्रश्नांप्रमाणेच या प्रश्नावरही आपल्या देशात गोंधळाची स्थिती आहे. कायदे अस्तित्वात असूनही, नागरिक व संस्था जागरूक असूनही, तसेच सर्वोच्च न्यायालयाने जनहिताच्या बाजूने निर्णय दिला असूनही विषारी कचऱ्याच्या आयातीला पायबंद घालणे आज अशक्य होऊन बसले आहे. अश्या परिस्थितीत विकासवादाच्या आड लपून अलंगसारख्या उद्योगांचे समर्थन करणाऱ्यांपासून जसे सावध राहिले पाहिजे तसेच विकास विरूद्ध पर्यावरण यासारख्या वृथा तात्विक वादातही फसता कामा नये. त्याऐवजी विषारी कचऱ्यासारख्या ज्वलंत समस्येवर जनजागृती करून त्याविरूद्ध व्यापक जनमताचा रेटा निर्माण करावा लागेल. त्याशिवाय ह्यासारख्या प्रश्नावर निर्णायक हालचाल करण्यास सरकारला भाग पाडणे शक्य होणार नाही.

■■

(टाईम्स ऑफ इंडिया, ९ डिसेंबर १९९८ आणि इंटरनेटचा उपयोग करून मिळालेल्या माहितीच्या आधारे हा लेख लिहिण्यात आला आहे.)

# निर्णयप्रक्रियेतील लोकांचा सहभाग

भारताला जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणण्यात येते. यातील अभिमानाचा भाग तात्पुरता बाजूला ठेवून आपण कठोर आत्मपरीक्षण करू लागलो तर जे चित्र दिसते ते समाधानकारक वाटत नाही. सध्याच्या आर्थिक दुरवस्थेचे व यादवीसदृश राजकीय स्थितीचे मूळ देशामध्ये सुयोग्य लोकशाही नसण्यामध्ये आहे की वाजवीपेक्षा जास्त लोकशाही असण्यामध्ये आहे, ह्या सारखे वाद हल्ली खेळले जातात. हे मोठे वाद बाजूला ठेवून भारतातील लोकशाहीचे मूल्यमापन करण्यासाठी ह्या लेखापुरती एकच साधी कसोटी लावूया. लोकशाहीचे मूळ तत्व म्हणजे लोकांना स्वतःचे भविष्य ठरवण्याचा अधिकार असणे. वेगळ्या शब्दात सांगायचे तर लोकशाहीमध्ये लोकांचा कारभारयंत्रणेच्या निर्णयप्रक्रियेत खराखुरा सहभाग असणे ही लोकशाहीची महत्वाची कसोटी ठरेल. यासंदर्भात भारतातले चित्र काय दिसते?

निवडणुकांची प्रक्रिया ह्या देशात गेली पन्नास वर्षे काही अपवाद वगळता सुरळीतपणे चालू आहे. निवडणुकांच्या माध्यमातून अगदी केंद्रीय स्तरावरची सरकारेही बदलली गेली आहेत, असे ढोबळ चित्र एकाबाजूला दिसते. दुसऱ्या बाजूला सूक्ष्मपणे पाहिल्यास असे दिसून येते की, सर्वसामान्य जनता- विशेषतः ग्रामीण, उपेक्षित, व आदिवासी जनता निर्णयप्रक्रियेपासून आजही दूरच राहिली आहे. लोकशाहीच्या आपण निवडलेल्या प्रतिमानानुसार (मॉडेलप्रमाणे) जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्याद्वारे जनतेचा निर्णयप्रक्रियेतील सहभाग घडून यावा अशी कल्पना असते. हे तत्व प्रत्यक्षात येण्यासाठी या प्रतिनिधींवर जनतेचा दबाव रहायला हवा. विविध कारणांमुळे आज तो राहिलेला नाही. त्यामुळे लोकशाही ऐवजी आपल्या देशात लोकप्रतिनिधीशाही चालू आहे असे आज म्हणावे लागते.

वेगळ्या शब्दात सांगायचे तर आज लोकशाही व निवडणुका ही काही निवडक वर्गाची सत्ता मिळविण्याची साधने झाली आहेत व सर्वसामान्य जनता ह्या खेळाची मूक साक्षीदार झाली आहे. तथापि या निराश होण्यासारख्या वाईट परिस्थितीतही, हताश न होता आज अनेक

व्यक्ति, संस्था विविध स्तरावर कारभारयंत्रणेच्या निर्णयप्रक्रियेतील लोकांचा सहभाग व अधिकार वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. अंधारातही आशेची किरणे दाखविणारी ही काही उदाहरणे.

मध्यप्रदेशातील आदिवासी भागातील जगदालपूर जिल्हा. १९८५ च्या उन्हाळ्यातील एक दुपार. प्रेमराम कर्मा बऱ्याच वर्षांनी आपल्या बुरमपाल गावी परत येत होते. मन बालपणीच्या आठवणीत रमलेले, पण गाव जसजसे जवळ येत होते तसतसे त्यांना काहीतरी वेगळे वाटू लागले. बालपणीच्या खाणाखुणा दिसत नव्हत्या. कारण हिरव्यागार वनराईने नटलेला तेव्हाचा तो परिसर अगदी ओसाड झाला होता. वृक्षतोडीने डोंगराची रया गेली होती, तर झुळझुळ वाहणारी नदी, ओढे कोरडे पडले होते. खिन्न मनाने ते गावात आले. नंतर त्यांना कळले की येथील प्राथमिक शाळाही बंद आहे. कारण शिक्षक येत नाहीत. ही परिस्थिती बघून प्रेमराम कर्मा यांनी एक महत्त्वाचा निर्णय घेतला. तो म्हणजे आपल्याच गावात कायम राहण्याचा व गावातील मुलांना शिकविण्याचा. पेशाने शिक्षक असलेल्या या हाडाच्या शिक्षकाला शाळेची दुरवस्था पाहवली नाही. आपल्या शिक्षणाचा उपयोग गावासाठी करण्याचे त्यांनी ठरविले. पहिली पायरी म्हणून त्यांनी दुसऱ्या गावातील शाळेतून आपली बदली बुरमपालच्या प्राथमिक शाळेत करवून घेतली. आजही प्रेमराम कर्मा त्याच शाळेत शिक्षक आहेत. नोकरी सरकारी असली तरी प्रेमराम 'सरकारी शिक्षक' नव्हते व नाहीत.

गावातील शाळा सुरू करण्याबरोबर त्यांनी गावाच्या आजूबाजूचे डोंगर हिरवे करण्याचा ध्यास धरला. या कामात त्यांनी गावकऱ्यांना सहभागी करून घेतले. याचे चांगले परिणाम लवकरच दिसू लागले. ओसाड जागा परत एकदा हिरवी होऊ लागली. सुमारे शंभर एकर जमीन पूर्ववत झाली. नदी, ओढा झुळझुळ वाहू लागले. आता गावकऱ्यांच्या मनालाही उभारी आली. अनेक शेतकऱ्यांनी शेती करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी बंधारे घातले, पाणी आपल्या शेताकडे वळविले, वर्षातून तीन पिके त्यांना मिळू लागली.

गावाची घडी अशाप्रकारे नीट बसत असताना एक नवा प्रश्न निर्माण झाला. एस. एम. डायकेम या कंपनीने या भागात एक पोलाद कारखाना

उभारण्याची घोषणा केली. तत्कालीन मुख्यमंत्री सुंदरलाल पटवा यांच्या हस्ते कारखान्याच्या बांधकामाचे भूमिपूजन झाले. बुरमपाल व आसपासच्या खेड्यांमधील जमिनी कंपनीच्या ताब्यात जाणार अशी बातमी पसरली. या वार्तेमुळे नागरिक पार हादरले. गावाची परिस्थिती सुधारण्याआधीच्या काळात असा एखादा प्रकल्प आला असता तर कदाचित गावकऱ्यांनी जमिनीच्या मोबदल्याच्या व प्रकल्पातील नोकऱ्यांच्या आशेने त्याला विरोध केला नसता. मात्र आता परिस्थिती बदलली होती. गावातील जमीन, पाणी, झाडे इ. नैसर्गिक संसाधनाचे जतन केले तर गावात समृद्धी येऊ शकते हे गावकऱ्यांनी अनुभवले होते. आता त्यांना कारखान्याच्या रूपाने आलेल्या विकासाच्या मृगजळामागे धावण्याची गरज नव्हती. त्यांच्या विकासाची गुंरूकिल्ली त्यांना सापडली होती. गावकऱ्यांनी प्रेमराम यांच्या मदतीने ह्या प्रकल्पाला प्राणपणाने विरोध करण्याचे ठरवले. प्रेमराम यांनी गावकऱ्यांच्या मदतीने हे आव्हान स्वीकारायचे ठरवले.

याच सुमारास भारत जन आंदोलनाचे नेते डॉ. बी. डी. शर्मा जगदालपूर येथे आले होते. डॉ. शर्मा १९६९-७१ या काळात बस्तर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी होते. तेव्हा त्यांनी आदिवासींच्या कल्याणासाठी चांगले काम केले होते, हे प्रेमराम यांना आठवले. त्यांनी तडक जगदालपूर गाठले आणि डॉ. शर्मा यांची भेट घेतली. कंपनीच्या ताब्यात जाणाऱ्या गावातील नागरिकांच्या प्रतिनिधींची आणि डॉ. शर्मा यांची एक भेट त्यांनी घडवून आणली. त्यावेळी झालेल्या चर्चेत अनेक बाबींचा विचार करण्यात आला. शेवटी या प्रकल्पाला सर्वशक्तीने विरोध करण्याचे ठरविण्यात आले. त्यातूनच स्थानिक पातळीवर मोठे आंदोलन उभे राहिले. स्थानिक जनतेच्या बरोबरीने डॉ. शर्मा आणि प्रेमराम यांनी हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी अथक प्रयत्न केले. एकदा तर डॉ. शर्मा यांची गुंडांकडून धिंड देखील काढण्यात आली होती. पण अशा घटनांनी हे जनआंदोलन न थांबता व्यापकच बनले. स्थानिक पातळीवर, देशात, तसेच देशाबाहेर प्रकल्पाच्या विरोधात जनमत तयार झाले. जनमताच्या रेट्यामुळे अखेर हा प्रकल्प बासनात गुंडाळण्यात आला.

## निर्णयप्रक्रियेतील क्रियाशील सहभाग

ह्या आंदोलनाच्या निमित्ताने अनेक महत्वाचे प्रश्न पुढे आले. गावची जमीन, पाणी, झाडे यांच्यावर पहिला अधिकार कुणाचा? त्यावर अवलंबून असणाऱ्या, त्यांची निगराणी करणाऱ्या, गावकऱ्यांचा की भोपाळ, दिल्लीमधील सरकारात बसलेल्या राजकारण्यांचा आणि अधिकाऱ्यांचा? गावाच्या नैसर्गिक संसाधनाबाबतचे, पर्यायाने गावाच्या भविष्याबाबतचे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत गावकऱ्यांचा खराखुरा सहभाग असला पाहिजे, एवढेच नव्हे तर त्याबाबतचा अंतिम निर्णय करण्याचा हक्क गावकऱ्यांचा असला पाहिजे अशी स्पष्ट मागणी ह्या आंदोलनातून पुढे आली.

बुरमपाल आणि आसपासच्या खेड्यातील आदिवासींनी स्वतःच्या गावाच्या संरक्षणासाठी केलेल्या यशस्वी संघर्षाप्रमाणे इतर ठिकाणीही अनेक छोटे मोठे संघर्ष झाले. त्यातून 'भारत जन आंदोलन' सारख्या समन्वयी संघटना बळकट झाल्या. त्यामुळे आदिवासींचे प्रश्न व मागण्या परिणामकारकरीतीने लोकसभेपर्यंत पोहचले. दहाव्या लोकसभेने मध्यप्रदेशातील आदिवासी भागातील तत्कालीन खासदार दिलीपसिंग भूरिया यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासींच्या प्रश्नांसंदर्भात एका समितीची स्थापना केली होती. भूरिया समितीने आदिवासी गावातील ग्रामसभांना गावच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा व्यापार आणि त्यावर आधारित गावचा विकास यासंदर्भातील निर्णयांबाबत अधिकार देण्याबाबत अनेक शिफारसी केल्या. ग्रामीण भागातील जनतेच्या व संघटनांच्या प्रयत्नांमुळेच अकराव्या लोकसभेत समितीच्या शिफारसींना समोर ठेवून घटनादुरूस्ती मंजूर करण्यात आली. ज्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या लोभापायी आदिवासींचे दमन केले जात असे, त्याच साधनसंपत्तीवर त्यांचा अधिकार मान्य झाला. पर्यायाने, आदिवासी स्वतःच्या विकासाची दिशा ठरवू शकतील अशी परिस्थिती कायद्याने निर्माण करण्यात आली. ब्रिटिशांच्या काळापासून न्याय्य हक्कांपासून वंचित राहिलेल्या आदिवासींना अखेर घटनेतील ह्या दुरूस्तीमुळे न्याय मिळाला.

ह्या घटनादुरूस्तीनंतर आता खेड्यातील ग्रामसभेला त्या खेड्यातील नैसर्गिक संसाधनाबाबतच्या निर्णयप्रक्रियेत सर्वोच्च स्थान देण्यात आले आहे. खेड्यातील सर्व प्रौढ नागरिकांना ग्रामसभेत सहभागी होण्याचा

अधिकार असतो. विकासाची कामे, मोहाच्या फुलासारख्या वादग्रस्त वस्तूंची खरेदी-विक्री, तणाव निर्माण करणाऱ्या लहान सहान घटनांबाबतचा निर्णय, जमीन व पाणी यांच्या वापराबाबतचा निर्णय अशा अनेक बाबींचे अधिकार आता ग्रामसभेला देण्यात आले आहेत. त्यामुळे ग्रामसभेने मंजुरी दिल्याखेरीज विकासाच्या किंवा इतर कामांची सुरुवात करता येत नाही. ह्या घटनादुरुस्तीमुळे आता राज्य अथवा केंद्र सरकारे देखील ग्रामसभेच्या परवानगीशिवाय एस. एम. डायकेम प्रकल्प सुरू करू शकणार नाहीत. प्रेमराम कर्मा सारख्या अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या उराशी बाळगलेले आदिवासींच्या स्वयंनिर्णयाचे व स्वयंप्रशासनाचे स्वप्न आता साकार होऊ शकेल.

अशाच काही उत्साहवर्धक घटना इतर ठिकाणीही घडल्या आहेत. गावाचे स्वयंनिर्णय किंवा ग्रामस्वराज्य ही कल्पना प्रत्यक्षात उतरू शकते हे मेंढा (लेखा) (जिल्हा गडचिरोली), महाराष्ट्रातील नागपूर-ब्रह्मपुरी महामार्गावरील सायगाटा गाव, सीद (जिल्हा उदयपूर, राजस्थान) या गावातील नागरिकांनीही दाखवून दिले आहे. सायगाटा या लहान गावातील नागरिकांनी संपूर्ण उजाड झालेले जंगल पुनर्जीवित केले. त्यापूर्वी त्यांच्यावर झाडाची खोडे-मुळे विकून उपजीविका करण्याची वेळ आली होती. जंगल पुन्हा वाढविताना या नागरिकांना सरकारी वन विभागाशी लढा द्यावा लागला. ग्रामस्वराज्याच्या आंदोलनामुळे गावाची एकंदरीत ताकद तर वाढलीच, परंतु गावातील स्त्रियांची व गरिबांची देखील ताकद वाढली असे स्थानिक कार्यकर्त्यांच्या लक्षात आले आहे. गावात आठ-दहा जातींचे लोक राहतात. दलित अल्पसंख्येत असले तरी गावाचे नेतृत्व सर्वसहमतीने दलित समाजातील एका व्यक्तीकडे सोपवण्यात आले आहे. इतर ठिकाणी दलितविरोधी दंगली झाल्या तरी या गावात त्या दंगलीचे लोण पसरत नाही. गावासंबंधित सारे निर्णय सर्वसहमतीनेच होतात.

शहरी भागातही असे प्रयत्न होताना दिसतात. पाकिस्तानातील कराची शहरातील ओरंगी झोपडपट्टीतील नागरिकांनी आपला स्वच्छतेचा प्रश्न असा एकत्र येऊनच सोडविला. पुण्यातही काही वसाहतीमधील नागरिकांनी एकत्र येऊन स्थानिक प्रश्न स्वतःच सोडविण्याच्या घटना घडल्या आहेत.

भारतासारख्या अवाढव्य देशात स्थानिक जनतेला स्वयंनिर्णयाचे व स्वयंप्रशासनाचे अधिकार दिल्यास स्थानिक संस्थाद्वारे जनहिताचे निर्णय घेणे सुलभ होते हे या घटनांवरुन सिद्ध होते. आर्थिक व सामाजिक विषमतेने ग्रस्त असलेल्या आपल्या समाजात लोकशाही अंमलात आणण्यासाठी कोणतीही रामबाण सूत्रे अस्तित्वात नाहीत. परंतु स्वयंनिर्णयाच्या हक्काद्वारे ग्रामीण व आदिवासी भागातील उपेक्षित जनतेपर्यंत लोकशाहीची फळे पोहोचवता येतील यात संशय नाही. त्यासाठी पुरेशी जागृती व राजकीय इच्छाशक्ती मात्र हवी.

■■

('ह्युमनस्केप' (सप्टेंबर ९८) मधील 'The Village Schoolmaster's Dream' (लेखक-राहुल) आणि 'आंदोलन' (१५ ऑगस्ट १९९८) या मासिकातील ''आमचा मंत्र-जयजगत! आमचे तंत्र-ग्रामस्वराज्य!!" (लेखक-मोहन हिराबाई हिरालाल) यातील माहितीच्या आधारे वरील लेख लिहिण्यात आला आहे.)

# बहुराष्ट्रीय कंपन्यांचे युग

**प्रास्ताविक** - जागतिक अर्थकारणाच्या वेगाने बदलणाऱ्या समीकरणांमुळे अनेक गोष्टींचा विचार नव्याने व वेगळ्याप्रकारे करणे आता गरजेचे होऊ लागले आहे. या नव्या अर्थकारणाचाच एक महत्त्वाचा घटक असलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या आणि त्याबाबतची विविध देशांची धोरणे यांना राष्ट्रीय व जागतिक अर्थकारणाच्या दृष्टीने आता फार महत्त्व प्राप्त झाले आहे. आपल्या देशात स्वदेशीवादी मंडळींचा या कंपन्यांना तीव्र विरोध आहे, तर याऊलट इतर अनेकजण पोटतिडकेने ह्या कंपन्यांचे समर्थन करताना दिसतात. या कंपन्या व त्यांचा वाढता व्यापार हा विषय आता फक्त औद्योगिक क्षेत्रापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर विविध देशांच्या अर्थव्यवस्थेवर, ग्राहकांवर, समाजजीवनावर, व राजकारणावर त्याचे भलेबुरे पण व्यापक परिणाम झाले आहेत, होत आहेत असे आता मानले जाते. बहुराष्ट्रीय कंपन्यांचा उदय युरोपीय राष्ट्रांमध्ये व अमेरिकेत झाला आणि अजूनही बहुतेक बहुराष्ट्रीय कंपन्या या पश्चिमेकडील राष्ट्रांशीच संबंधित असतात. बहुधा त्यामुळेच त्यांच्या वाढत्या वर्चस्वाला राजकारणाची किनारही आहे असे म्हटले जाते. १९९१ नंतर भारताने मुक्त बाजारपेठेच्या तत्वावर आधारित खुले आर्थिक धोरण स्वीकारल्याने भारतातही बहुराष्ट्रीय कंपन्यांचा व्याप फार मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे या बहुराष्ट्रीय कंपन्या म्हणजे काय? त्यांची कार्यपद्धती व धोरणे कशी असतात? तसेच त्यांच्या वाढत्या वर्चस्वामागील राजकीय किनार कोणती? हे सर्व प्रश्न भारतासाठी महत्त्वाचे आहेत.

**बहुराष्ट्रीय कंपन्या म्हणजे काय ?**

बहुराष्ट्रीय कंपनी म्हणजे काय ह्याची व्याख्या करण्यापासून सुरवात करूया. ज्या कंपन्या (किंवा उद्योग) एकाच वेळी त्यांच्या विविध देशातील विविध उपकंपन्या व संबंधित कंपन्या यामधील उत्पादनाची संपूर्ण प्रक्रिया (म्हणजे कारखाने, त्यातील मालमत्ता व संसाधने, कामगार, इत्यादि बाबी) नियंत्रित करतात व त्या उत्पादनाच्या विक्रीचे धोरण व त्यामागील विपणनाच्या पद्धती ह्यावर देखील नियंत्रण ठेवतात अश्या कंपन्याना अथवा उद्योगांना बहुराष्ट्रीय कंपन्या म्हणता येईल.

ह्या व्याख्येबरोबरीने बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या बाबतीत इतरही लक्षणे सांगितली जातात. त्यांच्या समभागांची मालकी व त्यांचे व्यवस्थापन करणारी मंडळी ह्यांबाबतही ह्या कंपन्या बहुराष्ट्रीय असतात असे म्हटले जाते. अनेकदा 'व्यापारी डावपेचाचा' भाग म्हणून उप किंवा सह कंपन्यांना बऱ्यापैकी स्वातंत्र्य दिलेले असले तरी मूळ बहुराष्ट्रीय कंपनीच्या व्यापक रणनीतीच्या चौकटीतच त्यांना रहावे लागते. आर्थिक व विशेषतः वित्तीय बाबतीत हे पथ्य कसोशीने पाळले जाते. बहुराष्ट्रीय कंपनी एकाच वेळी अनेक देशातील उप किंवा सह कंपन्यांवर नियंत्रण ठेवत असते. या इतर देशातील उप किंवा सह कंपन्यांच्या स्थापनेत स्थानिक व्यक्ति अथवा कंपन्यांचे सहकार्य घेतले जात असले तरी त्यामध्ये सिंहाचा वाटा मूळ बहुराष्ट्रीय कंपनीचा असतो. या छोट्या कंपन्यांना लागणारी आर्थिक, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, व कामगार विषयक सर्व प्रकारची मदत ही प्रमुख कंपनी करीत असते. त्या त्या देशातील उप अथवा सह कंपन्यांची नावे वेगळी असली तरी साधारणपणे प्रमुख कंपनीच्या नावाला जोडूनच दुसरे नवीन नाव शोधण्यात येते. एका झाडाच्या अनेक फांद्या असाव्यात त्याप्रमाणे ही रचना असते. नियोजन, धोरणे आणि तत्सम महत्त्वाच्या मुद्द्यांबाबतचे निर्णय प्रमुख कंपनी घेते. कंपनीची स्थावर मालमत्ता व इतर मत्ता यासह अनेक बाबींवर मुख्य बहुराष्ट्रीय कंपनीचा कायदेशीर तसेच प्रत्यक्ष अधिकार असतो.

**इतिहासाचा आढावा**

पोर्तुगीज, डच, व इंग्रज व्यापाऱ्यांनी १५ व्या व १६ व्या शतकात मोठ्या प्रमाणात परदेशात व्यापार सुरू केला. यानंतर त्यांच्याबरोबरीने युरोपातील इतर देशातील तसेच अमेरिकेतील काही कंपन्यांनी व्यापाराच्या निमित्ताने दक्षिण अमेरिका, आफ्रिका व आशिया खंडातील देशांमध्ये बस्तान बसविले. साधारणपणे १८६० नंतर या कंपन्यांनी आपल्या मूळ देशाव्यतिरिक्त इतर देशात उत्पादन सुरू केले. आज मोठ्या बहुराष्ट्रीय म्हणून गणल्या जाणाऱ्या अनेक कंपन्यांचा व्याप १९१४ पर्यंत विविध देशात स्थिरावला होता. १८८० ते १८९० या काळात अमेरिकेच्या औद्योगिक क्षेत्रात विविध घडामोडी होऊन अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या स्थापन झाल्या. त्याकाळात या स्पर्धेत अमेरिकेतील कंपन्यांनी मिळविलेली

आघाडी आजही कायम आहे. नंतर १९४६ ते १९७० या दुसऱ्या महायुद्धानंतरच्या कालावधीत अमेरिकेतील बहुराष्ट्रीय कंपन्यांची युरोपीय राष्ट्रांबरोबरीच्या व्यापारावरील पकड चांगलीच घट्ट झाली. अमेरिकेतील कंपन्यांशी बरोबरी करण्यासाठी युरोपातील अनेक छोट्या कंपन्यांनी आपापसात विलीनीकरण केले. (उदाहरणार्थ, १९६७ व १९६८ या दोन वर्षात ब्रिटनमध्ये सुमारे ५००० कंपन्यांनी विलीनीकरण केले.) विशेषतः यानंतरच्या काळात युरोपातील व ब्रिटनमधील अनेक नवीन कंपन्या बहुराष्ट्रीय म्हणून पुढे आल्या. १९८० ते १९९५ या काळात जागतिक स्तरावर झालेल्या आर्थिक घडामोडीमुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना खूप महत्त्व प्राप्त झाले. ह्या काळात भारतासारख्या अनेक विकसनशील राष्ट्रांमध्ये देखील या कंपन्यांना प्रवेश मिळाला व फार मोठी बाजारपेठ या कंपन्यांना उपलब्ध झाली.

**बहुराष्ट्रीय कंपन्यांचे औद्योगिक साम्राज्य**

जगातील औद्योगिक उत्पादन प्रक्रियेवर (चीन, क्यूबासारख्या देशांचा अपवाद वगळता) आज बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व आहे. अमेरिकेतून निर्यात होणाऱ्या बहुतांश मालाचे व सेवांचे उत्पादन बहुराष्ट्रीय कंपन्या करतात. त्यांच्या उत्पादनामध्ये ग्राहकोपयोगी वस्तूंपासून क्षेपणास्त्रांसारख्या युद्धसाहित्यापर्यंतच्या अनेक वस्तूंचा समावेश आहे. आधुनिक समाजाच्या दैनंदिन जीवनातील सर्व क्षेत्रे आता बहुराष्ट्रीय कंपन्यांनी व्यापली आहेत असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही.

या कंपन्यांचा व्याप अतिशय प्रचंड असतो. आजच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात देखील काही बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांची संख्या लाखाच्या घरात आहे यावरुन त्यांच्या आकाराची कल्पना यावी. आकडेवारी पाहिल्यास असे दिसते की जगभरचे उत्पादन व व्यापार यावर आज सुमारे २०० मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांची घट्ट पकड आहे. १९९२ मध्ये या २०० कंपन्यांची एकूण विक्री ५८६२ अब्ज डॉलर्स एवढी होती. यातील १७२ कंपन्या अमेरिका, जपान, फ्रान्स, जर्मनी व इंग्लंड या पाच देशात केंद्रित आहेत व त्यांची १९९२ मधील विक्री ५२१९ अब्ज डॉलर्स एवढी होती. ह्या तुलनेत पाहता भारताचे १९९१-१९९२ मधील एकूण राष्ट्रीय उत्पन्न १८४ अब्ज डॉलर्स इतके होते. थोडक्यात, अशी

एखादी बहुराष्ट्रीय कंपनी म्हणजे प्रचंड असे औद्योगिक साम्राज्यच असते. राष्ट्रांच्या सीमा, मर्यादा ओलांडून ह्या कंपन्यांची स्वतःची एक आर्थिक सत्ता तयार होते.

एवढी प्रचंड आर्थिक शक्ती असलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे सर्व काम अधिकाधिक नफा मिळविणे व विविध क्षेत्रातील व विविध देशातील उत्पादन व्यवस्थेवर ताबा मिळविणे या उद्दिष्टांभोवती केंद्रित झालेले असते. त्यासाठी त्यांच्यामध्ये अगदी तीव्र स्पर्धाही असते. त्यामुळे बहुतेक वेळा कायदा, स्थानिक विकास, पर्यावरण, नैतिकता, सामाजिक जबाबदाऱ्या, मानवी मूल्ये या सर्वांचा विचार त्यांच्याकडून नफ्याच्या व पैशाच्या माध्यमातूनच केला जातो असे टीकाकार म्हणतात.

**सहकार्याचे नवे गणित**

या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या संदर्भात सध्या विलीनीकरणाचे आणि इतर कंपन्या ताब्यात घेण्याचे (Takeovers) नवीन युग सुरू झाले आहे. गेल्या तीन वर्षात जगभरात अशा प्रकारच्या एकूण ३२ हजार औद्योगिक युती अस्तित्वात आल्या आहेत. यापैकी एक चतुर्थांश घटना अमेरिकन कंपन्यांशी संबंधित असून उरलेल्या तीन चतुर्थांश घटना इतर देशातील आहेत. आधीच शक्तिशाली असलेल्या या कंपन्या अश्या विलीनीकरणामुळे आणखी बळकट होत आहेत. अमेरिका वा युरोप येथील कंपन्यांच्या विलीनीकरणाचे परिणाम भारतासह अनेक राष्ट्रांवर आता होऊ लागले आहेत. भारतातही अनेक मोठ्या कंपन्या विलीनीकरणाच्या प्रक्रियेत गुंतल्या आहेत. टाटा ऑईल व ब्रिटीश पेट्रोलियम यांच्यातील असे सहकार्य ही एक नुकतीच घडलेली घटना आहे.

अशा विलीनीकरणामागे जास्तीत जास्त बाजारपेठेवर ताबा व नफा मिळवायचा व त्यायोगे आपले व्यापारी साम्राज्य प्रस्थापित करावयाचे व वाढवायचे हा उद्देश असतो. असे आर्थिक वर्चस्व मिळवण्यासाठी व ते कायम ठेवण्यासाठी पोषक ठरतील अश्या राजकीय व आर्थिक विचारसरणी व लोकांची मानसिकता या गोष्टी कंपन्यांच्या कार्यक्षेत्रातील देशांमध्ये असणे आवश्यक असते. त्या देशांतील बुद्धिजीवी वर्ग, राजकीय नेतृत्व व सामान्य माणूस या सर्वांचीच ह्या विचारसरणींना मान्यता मिळवावी लागते. अशी पोषक मानसिकता लोकात निर्माण होईल व

पोषक विचारसरणी आपल्या उत्पादनाएवढ्या किंवा त्यापेक्षा जास्त वेगाने पसरतील याची काळजी या कंपन्या घेतात असेही म्हटले जाते. स्थानिक कंपन्यांबरोबरच्या विलीनीकरणामुळे ह्या प्रक्रिया सुलभ होतात असे मानले जाते.

**राजकीय किनार**

जगातील बदलत्या अर्थकारणाचा एक महत्वाचा घटक म्हणजे अर्थकारण व राजकारण ह्यामधील सीमा पुसट होत जाण्याची प्रक्रिया किंवा अर्थकारणाचे राजकारणावरचे आक्रमण. पाश्चिमात्य देशांचे आंतरराष्ट्रीय राजकारण आता त्यांच्या आर्थिक हिताचे, पर्यायाने बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हिताचे रक्षण ह्याभोवती केंद्रित झाले आहे. ह्याचे प्रतिबिंब जागतिक बँक, नाणेनिधी, जागतिक व्यापार संस्था यासारख्या बहुपक्षी संस्थांच्या कारभारात तसेच दोन देशातील द्विपक्षी संबंधातही पडताना दिसते. अमेरिकेतील सीआयए सारख्या हेरसंस्था आपल्या अस्तित्वाचे समर्थन करताना आपण अमेरिकन कंपन्याना कंत्राटे मिळवण्यासाठी मदत व्हावी म्हणून परदेशात गुप्त कारवाया करतो हे आता उघडपणे सांगतात. त्याचेच पडसाद म्हणून भारतासारख्या देशात स्वदेशीवादी मंडळी अर्थकारणाचा भाग पूर्णपणे बाजूला ठेवून बहुराष्ट्रीय कंपन्या म्हणजे पाश्चिमात्यांचे राजकीय आक्रमण असे समीकरण मांडतात.

बहुराष्ट्रीय कंपन्याबाबतचे एकंदरीतले चित्र हे असे एका बाजूने गुंतागुंतीचे व दुसऱ्या बाजूने गोंधळाचे आहे. अश्या परिस्थितीत कोणत्याही भावनिक आवाहनाला अथवा पुस्तकी तर्कवादाला बळी न पडता व आपल्या देशातील सामान्य जनतेचे आर्थिक व राजकीय हित लक्षात घेऊन याबाबतीतली धोरणे तारतम्याने ठरवणे हा आजच्या काळातील मूलमंत्र ठरेल.

■■

सदर लेखासाठी - Christopher Tugendhat यांच्या 'The Multinationals', John Robinson यांच्या 'Multinationals and Political Control' या पुस्तकांचा तसेच Span (Sept.-Oct. 1997) आणि Economic Times यामधील लेखांचा आधार घेतला आहे.

# जागतिक धरण आयोग : एक आशादायक प्रक्रिया

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने औद्योगीकरण व शेतीचे आधुनिकीकरण यावर आधारित विकासाची कल्पना स्वीकारली. या प्रकारच्या विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी जी काही प्रमुख साधने मानली जात, त्यात मोठी धरणे हे एक महत्त्वाचे साधन होते. पं. जवाहरलाल नेहरूंनी तर मोठी धरणे, पोलाद कारखाने अशा प्रकारच्या मोठ्या विकासप्रकल्पांना आधुनिक मंदिरे म्हटले होते. मोठ्या धरणाचे समर्थन करताना उद्योगांना वीज, शेतीला हुकुमी पाणी, व पूरनियंत्रण (विशेषतः गंगा-यमुनेच्या खोऱ्यात) अशी मोठ्या धरणांची महत्वाची कामे सांगितली जातात. आधुनिक विकासाला अत्यावश्यक अश्या वीजनिर्मिती व सिंचन ह्या दोन बाबींची पूर्तता करण्यामध्ये महत्वाचे योगदान देणाऱ्या मोठ्या धरणांना पर्याय नाही अशी भूमिका नेहमी मांडली जाते. थोडक्यात, 'मोठी धरणे म्हणजेच विकास' असे समीकरण, जे स्वातंत्र्यानंतरच्या सुरवातीच्या काळात मांडले जाऊ लागले ते आजही बव्हंशी ग्राह्य मानले जाते.

धरणे बांधताना होणारे स्थानिक जनतेचे विस्थापन, निर्माण होणाऱ्या पर्यावरणासंबंधीच्या समस्या, धरणाच्या वरच्या व खालच्या अंगांना नदीकाठाने तसेच कालव्यांच्या बाजूने वसलेल्या गावातील लोकांच्या शेतीवर व उपजीविकेच्या इतर साधनांवर होणारे दुष्परिणाम या सर्व गोष्टींकडे तेव्हापासूनच दुर्लक्ष करण्यात आले. खरेतर स्वातंत्र्यपूर्वकाळातच पुणे जिल्ह्यातील मुळशी धरणाविरुद्ध सेनापती बापटांच्या नेतृत्वाखाली स्थानिक शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन केले होते. पण ह्या विकासाच्या मंत्राची जादू एवढी तीव्र की धरणाच्या सर्व दुष्परिणामांचे "विकासाची अपरिहार्य किंमत" म्हणून एकप्रकारे गौरवीकरण करण्यात आले व ही किंमत चुकवणाऱ्यांवरचा अन्याय या गौरवीकरणाच्या आड दडवण्यात आला.

### धरणविरोधी आंदोलनांची सुरूवात

स्वातंत्र्यानंतर एकदीड दशकातच मोठ्या धरणांबरोबर विकासाच्या इतर महाप्रकल्पांचे व संबंधित विकास कार्यक्रमांचे दुष्परिणाम स्पष्ट होऊ लागले. ह्या प्रकल्पांचा व कार्यक्रमांचा फटका ज्यांना बसला ते ग्रामीण व

आदिवासी भागातील जनसमुदाय हळूहळू जागृत होऊ लागले. आपण केवळ विकासाची किंमत चुकवतो पण त्याचे फायदे मात्र इतरच पळवितात हे त्यांच्या लक्षात येऊ लागले. त्यांना शहरी भागातील काही बुद्धिजीवी व कार्यकर्त्यांची साथ मिळू लागली. यातूनच १९७० नंतर भारतभर विविध ठिकाणी विकासप्रकल्पांविरूद्ध चळवळी उभ्या राहू लागल्या. त्यातील बऱ्याच चळवळीनी ह्या प्रकल्पांचा नैसर्गिक स्थानिक संसाधनावर होणाऱ्या दुष्परिणामांचा प्रश्न लावून धरला. त्यांना पर्यावरणवादी चळवळी म्हणून ओळखले जाऊ लागले. खरे तर त्यांच्या मांडणीत पर्यावरणाच्या पाश्चिमात्य संकल्पनेपेक्षा ज्यावर स्थानिक लोकांची उपजीवीका अवलंबून आहे, अश्या नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण व त्यावरील स्थानिक जनतेच्या हक्कांचे रक्षण हे महत्वाचे मुद्दे होते.

ह्या सुरवातीच्या काळात गढवाल भागातील हिमालयाच्या रांगामधील वृक्षतोडी विरुद्धचे स्थानिक लोकांचे 'चिपको' आंदोलन व केरळातील 'सायलेंट व्हॅली' धरण प्रकल्पाविरुद्धचे आंदोलन यांना बऱ्यापैकी यश तसेच राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय प्रसिद्धीही मिळाली. १९८० च्या दशकानंतर धरणाविरुद्ध व इतर विकासप्रकल्पाविरुद्ध देशभरात सर्वदूर आंदोलने होऊ लागली. त्यातली दोन आंदोलने विशेषकरून गाजली. हिमालयातील टेहरी धरणाविरुद्धचे आंदोलन चिपको आंदोलनातील सुंदरलाल बहुगुणा ह्या ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली लढले जात आहे. तर मेधा पाटकर व त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांच्या मदतीने स्थानिक आदिवासी नर्मदा नदीवरील सरदार सरोवर धरणाविरुद्ध गेली तेरा वर्षे लढा देत आहेत. 'नर्मदा बचाव आंदोलन' मधील कार्यकर्त्यांनी नर्मदेच्या खोऱ्यातील आदिवासींचे हे आंदोलन संपूर्ण देशात पसरविले. जागतिक बँकेने ह्या धरणाला मदत केली तेव्हा आंदोलनाने बँकेशी यशस्वी मुकाबला केला. शेवटी बँकेने प्रकल्पातून अंग काढून घेतले.

### आंदोलनाचे यश

आंदोलनातील विविध संघर्षात्मक कार्यक्रमांबरोबरच जगभर विविध स्तरावर, विविध माध्यमातून 'मोठी धरणे' ह्या विषयावर एक व्यापक, सखोल चर्चा सुरू करण्यात 'नर्मदा बचाओ' आंदोलनाला यश आले. या

चर्चेमध्ये मोठी धरणे, त्यांची आवश्यकता, त्यांचे अर्थकारण व राजकारण, त्यांचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, व पर्यावरणीय दुष्परिणाम, त्यांचे रूढ विकास प्रक्रियेतील स्थान, एवढेच नव्हे तर धरणांपलिकडे जाऊन मूळ रूढ विकास प्रक्रियेतील सैद्धांतिक व अंमलबजावणीच्या स्तरावरील त्रुटी ह्या सर्व मुद्यांचा त्यात समावेश होता.

धरण बांधणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या, त्यांना भांडवल पुरविणाऱ्या जागतिक बँकेसारख्या बहुपक्षीय संस्था, विविध क्षेत्रातील सरकारी संस्था, मुख्य राजकीय पक्ष, त्याबरोबरीने विविध देशातील व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांच्या संस्था, ह्या सर्वांच्या घट्ट व महाशक्तिशाली अशा धरणसमर्थक फळीशी ह्या धरणविरोधकांनी टक्कर घेतली. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील वर उल्लेखलेल्या संस्थांच्या धुरीणांचा व अधिकाऱ्यांचा सुरूवातीला ही चर्चा टाळण्याकडेच कल होता. त्यासाठी त्यांनी ह्या चर्चेला अनुल्लेखाने मारण्याचा व त्यातील मुद्यांची हेटाळणी करण्याचा भरपूर प्रयत्न केला. परंतु दोन कारणांनी हा प्रयत्न साफ अयशस्वी ठरला. एक कारण होते धरणविरोधकांच्या मुद्यांतील सैद्धांतिक ताकद व दुसरे कारण होते ह्या चर्चेबाबत विविध राजकीय कार्यक्रमांद्वारे व संपर्क माध्यमाद्वारे धरणविरोधकांनी केलेली जनजागृती व त्यातून राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावर निर्माण झालेला जनमताचा रेटा.

आपण ह्या लेखात प्रामुख्याने भारताचा विचार करीत असलो तरी जगात विविध ठिकाणी धरणविरोधी जनसंघर्ष व चळवळी ह्याच काळात उभ्या राहिल्या हे लक्षात घेतले पाहिजे. ह्या चळवळींनी एकत्र येऊन जागतिक स्तरावर हे धरणविरोधी आंदोलन व ही चर्चा चालू ठेवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. साधारणपणे दशकभर जागतिक स्तरावर चाललेल्या ह्या आंदोलनात व चर्चेमध्ये एक टप्पा असा आला की धरणाच्या बाजूने असलेल्या विविध संस्थांना, धरण विरोधकांच्या मुद्यांना टाळून पुढे जाणे केवळ अशक्य होऊन बसले. यातूनच जागतिक धरण आयोगाची कल्पना पुढे आली.

**धरण आयोग : एक आशादायक प्रक्रिया**

१९९७ च्या एप्रिल महिन्यात स्वित्झर्लंड मधील ग्लँड ह्या गावी धरणसमर्थक व धरणविरोधक असलेले विविध गट या परिस्थितीतून मार्ग

काढण्यासाठी एकत्र आले. त्यासाठी एकाबाजूने जागतिक बँक व दुसऱ्याबाजूने 'आंतरराष्ट्रीय निसर्गजतन संस्था' ह्यांनी पुढाकार घेतला. त्या बैठकीत एकमताने असे ठरले की मोठ्या धरणांचे फायदे-तोटे एका व्यापक दृष्टिकोनातून व निःपक्षपातीपणे तपासून घेण्यासाठी एका स्वतंत्र व स्वायत्त अशा जागतिक धरण आयोगाची स्थापना करण्यात यावी. यापुढे जगात जी मोठी धरणे बांधली जातील त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्वमान्य निकष, मार्गदर्शक तत्वे, व आदर्श कामकाजपद्धती तयार करण्याचे कामही या आयोगाने करावे असे ठरविण्यात आले.

फेब्रुवारी १९९८ मधे जागतिक धरण आयोगाची रीतसर स्थापना झाली. या आयोगाचा कार्यकाल फेब्रुवारी १९९८ ते २००० असा दोन वर्षांचा आहे. आयोगामध्ये विविध देशातील एकंदर बारा मान्यवर सभासद असून त्यात पाच स्त्रिया आहेत. हे सदस्य मोठ्या धरणावरील विवादाशी संबंध असलेल्या विविध समर्थक तसेच विरोधक घटकांशी संबंधित आहेत. ह्या सर्वांनी आपल्या अनुभवाचा, ज्ञानाचा फायदा आयोगाच्या कामकाजासाठी दिला तरी आयोगाचे निष्कर्ष काढताना त्यांनी निःपक्षपातीपणे काम करावे असे ठरले आहे. ह्यामध्ये धरण बांधणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे अध्यक्ष, धरणसमर्थक तज्ञांच्या संघटनेचे माजी अध्यक्ष यांच्याबरोबरच पर्यावरणवादी व जनसंघर्ष चळवळीतील कार्यकर्त्यांचाही समावेश आहे. ह्या सदस्यांमध्ये भारतातील मेधा पाटकर व लक्ष्मीचंद जैन ह्या दोघांचा समावेश आहे.

या आयोगाचे प्रत्यक्ष कामकाज आता सुरू झाले आहे. प्राथमिक कामकाजानंतर आयोगाने आपली पहिली जाहीर सुनावणी नोव्हेंबर १९९८ मध्ये भारतामध्ये भोपाळ येथे घ्यावयाचे ठरवले होते. त्यासाठी केंद्रसरकार व मध्यप्रदेश सरकारने परवानगी दिली होती. परंतु सर्व तयारी पूर्ण झाल्यावर गुजराथ राज्य सरकारच्या दबावाखाली येऊन आयत्यावेळी केंद्र सरकारने आयोगाला भारतात कामकाज करण्याची परवानगी नाकारली. लोकशाहीचे गुणगान करणाऱ्या भारताने धुडकावले तरी दहशतवादाने त्रस्त, उद्ध्वस्त झालेल्या श्रीलंकेने त्यांच्या देशात अनेक धरणविरोधी विवाद व चळवळी असूनही अशी सुनावणी करण्यास परवानगी दिली. शेवटी श्रीलंका सरकारच्या पूर्ण सहकार्याने डिसेंबर १९९८ मध्ये श्रीलंकेत

आयोगाची पहिली जाहीर सुनावणी झाली. यावेळी विविध पातळीवरील, (विशेषतः दक्षिण आशियातील) व्यक्ती व संस्थांशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांची मते जाणून घेण्यात आली. यात तज्ज्ञ व्यक्तींपासून विस्थापितांपर्यंत सर्वांचा समावेश होता.

विकास, विस्थापन, पर्यावरण अश्या अनेक बाबींवर अभ्यासपूर्ण प्रकाश पडू शकेल अशा रीतीने आयोगाचे काम सुरू झाले आहे. मोठ्या धरणासारख्या आत्यंतिक विवाद असलेल्या विषयाची तड लावण्याच्या निश्चयाने आजपर्यंत सर्वस्व पणाला लावून लढणारे धरणसमर्थक व धरणविरोधी विविध गट जागतिक स्तरावर एकत्र आले आहेत. दोन्ही बाजू एकमेकांच्या मुद्यांची खुलेपणाने चर्चा करुन त्यातून सर्वांचे हित जपणारा मध्यममार्ग शोधून काढण्याच्या प्रयत्नात आहेत. असा मध्यममार्ग काढणे ही निश्चितच अतिशय कठीण प्रक्रिया आहे. परंतु जगापुढे असलेले मोठ्या धरणांसारखे आत्यंतिक महत्वाचे व तीव्र विवाद असणारे प्रश्न विचारविनिमयाने व समजुतीने सोडवावे लागतील. त्यादृष्टीने पाहता 'जागतिक धरण आयोग' ही एक आशादायक सुरुवात मानता येईल.

■■

(जागतिक धरण आयोगाची माहितीपत्रके, त्यावरील लेख, व त्या प्रक्रियेत भाग घेणाऱ्या व्यक्तींशी झालेला संवाद यांचा उपयोग करून वरील लेख लिहिण्यात आला आहे.)

# भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी

इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ही संस्था प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ कै. वि. म. दांडेकर यांच्या पुढाकाराने १९७० साली स्थापन करण्यात आली. या संस्थेचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.
(अ) भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे; (ब) अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे; आणि (क) इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयावरील साहित्य/पत्रके/पुस्तिका योग्य नमुन्यात तयार करुन प्रकाशित करणे.

१९८९ सालापासून "भारताचा आर्थिक, सामाजिक, राजकीय विकास" ह्या विषयाला वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) संस्थेतर्फे चालवले जाते. त्याचबरोबरीने संस्थेतर्फे वेळोवेळी विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यासारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्याशिवाय विविध विषयांवर सामान्य वाचकाला ज्ञान देणाऱ्या छोट्या छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

---

## संस्थेचे मंडळ


नीळकंठ रथ, अध्यक्ष
कुमुदिनी दांडेकर
रामदास होनावर
स.वा. कोगेकर
आनंद नाडकर्णी
एम. व्ही. नाडकर्णी
के. एन. राज
सत्यरंजन साठे
ए. वैद्यनाथन
सु. म. विद्वांस
डी. सी. वधवा
सुनीती राव
सुबोध वागळे, प्रभारी संचालक

# भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी, पुणे १६

अर्थबोध पत्रिका अंक-२, जानेवारी १९९९
(केवळ खाजगी वितरणासाठी)

**बुक पोस्ट / छापील पुस्तिका**

**प्रेषक:**
भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी,
'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६.
फोन : ३५७१३२ / ३५७२१०
e-mail : ispepune@pn2.vsnl.net.in